# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in

क्रमांक : ५(३)/वश्रेनिश्रे/२०१०/२४९५३
दिनांक: २० एप्रिल, २०१०

प्रति,
सर्व प्राचार्य,
शासकीय तंत्र निकेतने

**विषय : शासकीय तंत्र निकेतने व तत्सम संस्थांतील अधिव्याख्यात्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरीष्ठश्रेणी / निवडश्रेणी प्रदान करणेबाबत...**

**संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एससीटी-६५१०/(२१/१०)/तांशि-१, दिनांक १५ एप्रिल, २०१०**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांतील अधिव्याख्यात्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत वरीष्ठश्रेणी / निवडश्रेणी प्रदान करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, सदरच्या शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेतील ज्या अधिव्याख्यात्यांना वरीष्ठश्रेणी / निवडश्रेणी प्रदान करण्यांत आलेली आहे त्यांची वेतननिश्चिती संस्थांप्रमुखांनी त्यांच्या अधिकारात करुन त्याप्रमाणे सुधारित वेतन संस्थास्तरावर त्वरीत लागू करावे. त्यासाठी आवश्यक त्या अनुदानाची तरतूद करुन घेण्यांत यावी. तसेच संबंधितांना सदरची वेतनश्रेणी लागू करताना अतिप्रदान झाल्यास त्यांचेकडून एकरकमी वसूली करण्याबाबतचे हमीपत्र घेण्यांत यावे. त्याचप्रमाणे सुधारित वेतननिश्चितीमुळे संबंधितांना देय होणाऱ्या वेतन थकबाकीसाठीही अनुदान उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करुन त्यांचे वेतन व भत्त्याच्या थकबाकीचे विवरणपत्र तयार करावे.

सदरच्या वेतननिश्चितीच्या पडताळणीसाठी संबंधितांची सेवापुस्तके वेतननिश्चितीच्या तीन प्रतींसह तयार ठेवण्यांत यावीत. शक्य तेवढ्या लवकर आपणांस सदरच्या पडताळणीबाबत कळविण्यांत येईल.

( गु.रा. ठाकरे )
प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण,
म.रा. मुंबई

प्रत : सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये.